यवतमाळ जिल्ह्यामधील आदिवासी शेतकरी व वनपट्टेधारकांसाठी शाश्वत कृषी विकास प्रकल्प या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः केंद्रीय-२०१९/प्र.क्र. ८७/का-१९
मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख: ११/०९ /२०१९

संदर्भ-

१.जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०१/२०१६-Grants,दि.०१/०३/२०१७

२. आदिवासी विकास विभाग, शासननिर्णय क्र. केंद्रिय-२०१६/प्र. क्र. ६४/ का.१९, दिनांक २१/०३/२०१७

प्रस्तावना-

केंद्र शासनाकडून विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत अनुदान , भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत व अदिम जमाती विकास कार्यक्रम या योजनाअंतर्गत राज्य शासनास अनुदान प्रदान होत असते. सदर योजनेतंर्गत प्राप्त निधीमधून शेतक-यांसाठी प्रगत कृषी तंत्रज्ञान वापरून उत्पन्नवाढ करणे ,रोजगारनिर्मिती, आदिवासी जनतेसाठी शिक्षण व आरोग्यासाठी योजना राबविण्यात येतात. केंद्र शासनाकडून सन २०१६-१७ करिता भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१) अंतर्गत Integrated Agriculture Development Plan and allied activities करिता निधी प्राप्त झालेला आहे. सदर योजनेतंर्गत प्रकल्प अधिकारी,ए.आ.वि.प्र.,पांढरकवडा यांना रू.२५८.५२ लक्ष निधी वितरित करण्यात आलेला आहे.

२ दीनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ,यवतमाळ या संस्थेअंतर्गत कृषी विषयक संशोधन व प्रशिक्षण केंद्र , निलोना,यवतमाळ यांचेमार्फत कृषी संशोधन व प्रशिक्षण तसेच शेतीमधील धोके कमी करणे,पीक लागवडीचा खर्च कमी करणे,पीक उत्पादनात वाढ करणे, नैसर्गिक संवर्धनाला पुरक व पोषक निविष्ठा निर्मिती,रसायन विरहीत शेती,आर्थिकदृष्ट्या परवडणारी छोट्या शेतकरी कुटुंबासाठी शेती मॉडेल,बहुविध पीक पद्धती आणि दुय्यम व्यवसाय,शेती कार्याचे गट निर्माण करून पीक उत्पादनात वाढ करणे इ.कार्यक्रम राबविण्यात येतात.

३. दीनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ,यवतमाळ या संस्थेअंतर्गत कार्यरत असलेल्या कृषी संशोधन व प्रशिक्षणाच्या माध्यमातून पायाभूत सुविधांचा विकास या प्रकल्पासाठी राज्य मंत्रीमंडळाच्या दि.०८.०३.२०१९ रोजीच्या बैठकीत रू.२.०० कोटी निधी मंजुर झालेला आहे. दीनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ,यवतमाळ यांनी प्रकल्प अधिकारी,ए.आ.वि.प्र.,पांढरकवडा यांच्या कार्यक्षेत्रात आदिवासी शेतक-यांसाठी शाश्वत कृषी विकास प्रकल्प हा रु.१४२.५३ लक्ष निधीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रकल्पांतर्गत यवतमाळ जिल्हयांतील मारेगाव, राळेगाव, झरी आणि पांढरकवडा तालुक्यांतील आदिवासी क्षेत्रामधील २२० गावांसाठी ४४०० शेतकरी कुटुंबे व वनपट्टाधारकांना लाभ होणार आहे.

४. आदिवासी शेतक-यांसाठी पीक लागवडीचा खर्च कमी करणे,पीक उत्पादनात वाढ करणे, नैसर्गिक संवर्धनाला पुरक व पोषक निविष्ठा निर्मिती,रसायन विरहीत शेती,आर्थिकदृष्ट्या परवडणारी छोट्या शेतकरी

कुटुंबासाठी शेती मॉडेल,बहुविध पीक पद्धती आणि दुय्यम व्यवसाय,शेती कार्याचे गट निर्माण करून पीक उत्पादनात वाढ करणे इ.कार्यक्रम राबवून उत्पन्नवाढ करणे आवश्यक आहे. सबब, या क्षेत्रामध्ये कामाचा अनुभव असलेल्या दीनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ,यवतमाळ या संस्थेमार्फत आदिवासी शेतकरी व वनपट्टेधारकांसाठी शाश्वत कृषी विकास प्रकल्प ही योजना राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांना मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

शासन निर्णय-

आदिवासी शेतक-यांसाठी पीक लागवडीचा खर्च कमी करणे,पीक उत्पादनात वाढ करणे, नैसर्गिक संवर्धनाला पुरक व पोषक निविष्ठा निर्मिती,रसायन विरहीत शेती,आर्थिकदृष्ट्या परवडणारी छोट्या शेतकरी कुटुंबासाठी शेती मॉडेल,बहुविध पीक पद्धती आणि दुय्यम व्यवसाय,शेती कार्याचे गट निर्माण करून पीक उत्पादनात वाढ करणे या कार्यक्रमार्तंगत सन २०१६-१७ करिता भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१) अंतर्गत Integrated Agriculture Development Plan and allied activities करिता प्राप्त निधीमधून आदिवासी शेतकरी व वनपट्टेधारकांसाठी शाश्वत कृषी विकास प्रकल्प ही योजना आदिवासी विकास विभाग व दीनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ,यवतमाळ यांच्यामार्फत संयुक्तपणे राबविण्यासाठी एकुण रु.१४२.५३ लक्ष किंमतीच्या अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांना या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक-१ नुसार मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतूदींच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही आयुक्त, आदिवासी विकास ,नाशिक यांनी करावी व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९११२०२३२८५८२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh Shivaji Jadhav

Digitally signed by Santosh Shivaji Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f635bf4a671627c02b82e6a01acb4a38afc24f58a5534a9d1271fe258a564b0, serialNumber=b8ee819ccc335cea98640b72c63671dd013899d3601f09ce4ea340e1741652a0, cn=Santosh Shivaji Jadhav
Date: 2019.09.16 18:23:18 +05'30'

(संतोष जाधव)

कार्यासन अधिकारी

प्रत,

१) मा.मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
२) मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव,आदिवासी विकास यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई
४) आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक.
५) सहसचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.

६) उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) अपर आयुक्त, आदिवासी विकास अमरावती.
८) प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा.
९) प्रतिनिधी, दीनदयाल बहुउद्देशीय प्रसारक मंडळ,यवतमाळ.
१०) संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
११) निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई

परिशिष्ट-१

(रुपये लाखात)

१	**योजनेचे नाव**	यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी शेतकरी व वनपट्टेधारकांसाठी शाश्वत कृषी विकास प्रकल्प
२.	**योजनेचे लाभक्षेत्र**	यवतमाळ जिल्हयातील मारेगाव, राळेगाव, झरी आणि पांढरकवडा तालुक्यातील २२० गावे

अ.क्र.	तालुक्यांची नावे	गावाची नावे (पहिले वर्ष)	गावाची नावे (दुसरे वर्ष)	एकूण शेतकरी संख्या (पहिले वर्ष)	एकूण शेतकरी संख्या (दुसरे वर्ष)
१	मारेगाव	३५	३५	७००	७००
२	राळेगाव	३५	२५	७००	७००
३	झरी	१५	२५	२००	४००
४	केळापुर	१५	२५	४००	६००
		१००	**१२०**	**२०००**	**२४००**

३	**वित्तीय तरतूद**	सन २०१६-१७ करिता भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५(१) अंतर्गत Integrated Agriculture Development Plan and allied activities करिता प्रकल्प अधिकारी,ए.आ.वि.प्र.,पांढरकवडा यांना प्राप्त रू.२५८.५२ लक्ष निधीमधून खर्च करण्यात येईल.
४	**या योजनेत येणारे खर्चाचे अंदाजपत्रक**	**एकूण खर्च -रु.१४२.५३लक्ष** **लाभार्थी कुटुबांची संख्या -४४००**

क्र	बाब	प्रथम वर्ष	द्वितीय वर्ष	एकूण
१	गावांची संख्या	१००	१२०	२२०
२	लाभार्थी क्षेत्र (एकर मध्ये)	१०,०००	१२,०००	२२,०००
३	लाभार्थी शेतकरी कुटुंब संख्या	२०००	२४००	४४००
४	Field workers ची संख्या	२०	२४	
५	Field workers मानधन (रू.८०००/- प्रति महिना , दरवर्षी १०% वाढ)	१९,२०,०००	२३,०४,०००	४२,२४,०००
६	**संकुल पर्यवेक्षकची संख्या**	५	६	
७	**संकुल supervisor** मानधन (रू.१२,०००/- प्रति महिना , दरवर्षी १०% वाढ)	७,२०,०००	९,५०,४००	१६,७०,४००

		८	**संशोधक संख्या - ४**	२	२	४
		९	संशोधक मानधन (रू.१५,००० /- प्रति महिना , दरवर्षी १०% वाढ)	३,६०,०००	३,९६,०००	७,५६,०००
		१०	प्रकल्प समन्वयक -२	१	१	
		११	प्रकल्प समन्वयक मानधन (रू.१५,००० /- प्रति महिना ,दरवर्षी १०% वाढ)	१,८०,०००	१,९८,०००	३,७८,०००
		१२	प्रवास भत्ता (Field workers) रू.३,०००/- प्रति महिना, दरवर्षी १०% वाढ)	७,२०,०००	९,५०,४००	१६,७०,४००
		१३	प्रवास भत्ता (**संकुल पर्यवेक्षक व प्रकल्प समन्वयक**) रू.३,५००/- प्रति महिना, दरवर्षी १०% वाढ)	८,४०,०००	११,०८,८००	१९,४८,८००
		१४	माती परिक्षण २०० नमुने प्रति वर्ष @ रू.४०० प्रति नमुना	८०,०००	८८,०००	१,६८,०००
		१५	माहिती प्रसारण साहित्य	१,००,०००	२०,०००	१,२०,०००
			Capital cost - **दोन प्रदान निर्मिती केंद्रे (मारेगाव व राळेगाव)**			
		१६	४०० स्क्वे फुट चे २ शेड @ रु. ६०० प्रति स्क्वे फुट	४,८०,०००		
			१०० प्लास्टीक ड्रम @ १,००० प्रति ड्रम	१,००,०००		
			Shredders,grinders and pulverizers(२ युनिट)	२,००,०००		
			एल.पी.जी. स्टोव्ह व भांडे (२ युनिट)	४०,०००		
			प्रदान निर्मिती केंद्र एकूण खर्च	८,२०,०००		८,२०,०००
		प्रदान निर्मिती केंद्राच्या ठिकाणी लेबर कॉस्ट				
			लेबर दिवसांची संख्या	६००	७५०	१३५०
			२ प्रदान निर्मितीच्या ठिकाणी एकूण लेबर खर्च	४,२०,०००	५,७७,५००	९,९७,५००
			Bottling and transporation of inputs to Farmers(Number of Cans ५ ltrs each)	४,०००	८००	४८००

	कॅन ची एकूण किंमत (वाहतुक खर्चासह) @ रू.५० प्रती कॅन	२,००,०००	४०,०००	२,४०,०००
	खर्च	६३,६०,०००	६५,९७,१००	१,२९,५७,१००
	प्रशासकीय खर्च व मुल्यमापन सनियंत्रण खर्च (Documentation,Monitoring, training,reporting and office support) ८ %	५,०८,८००	५,२७,७६८	१०,३६,५६८
	**विभागासाठी मुल्यमापन व सनियंत्रण निधी (२%)	१,२७,२००	१,३१,९४२	२,५९,१४२
	एकूण खर्च	**६,३६,०००**	**६,५९,७१०**	**१,४२,५२,७१०**

(सर्व प्रकारचे कर अंमलबजावणी यंत्रणेला अदा करावे लागतील)

** योजनेच्या मुल्यमापन व सनियंत्रणासाठी मंजुर निधीच्या २ % निधी प्रकल्प अधिकारी,पांढरकवडा यांच्याकडे राखीव ठेवण्यात यावा.

५	**योजना राबवणारी यंत्रणा**	प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय पांढरकवडा व दीनदयाल बहुउददेशीय प्रसारक मंडळ,यवतमाळ
६	**नियंत्रक अधिकारी**	अपर आयुक्त, आदिवासी विकास अमरावती.
७	**योजनेचा उद्देश/ हेतु**	१.आदिवासी शेतक-यांसाठी पीक लागवडीचा खर्च कमी करणे, २.पीक उत्पादनात वाढ करणे, नैसर्गिक संवर्धनाला पुरक व पोषक निविष्ठा निर्मिती,रसायन विरहीत शेती,आर्थिकदृष्ट्या परवडणारी छोट्या शेतकरी कुटुंबासाठी शेती मॉडेल,बहुविध पीक पद्धती आणि दुय्यम व्यवसाय,शेती कार्याचे गट निर्माण करून पीक उत्पादनात वाढ करणे इ.
८	**योजना अंमलबजावणीची कार्यपध्दती**	**योजना राबविण्याची कार्य पद्धती खालील प्रमाणे असेल** १) सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने दीनदयाल बहुउददेशीय प्रसारक मंडळ ही संस्था अंमलबजावणी यंत्रणा म्हणून कामकाज करेल. २) योजनेच्या अनुषंगाने ए.आ.वि.प्रकल्प पांढरकवडा यांच्या कार्यक्षेत्रामध्ये अशा एकूण २२० गावांची निवड केली जाईल . ३) शेती पद्धतींचे प्रसारण - ४) जैविक निविष्ठांची निर्मिती व पुरवठा- ५) संशोधन - a. कम्पोस्टींग च्या विविध पध्दतीचा विकास करणे जेणेकरुन जमिनीची प्रत सुधारण्याकरिता योग्य पध्दत सुचविता येईल. b. बियाणे प्रक्रियेच्या विविध पध्दती विकसित करणे c. Herbal extract ची कीटनाशक व वाढवर्धक म्हणून तपासणी करणे

		६) २२० गावातून ४४०० लाभार्थ्यांच्या २२,००० एकर क्षेत्रावर अंमलबजावणी यंत्रणा कार्य करेल. ७) प्रत्येक गावामधून लाभार्थी शेतकऱ्यांची निवड अंमलबजावणी यंत्रणा व प्रकल्प कार्यालय संयुक्तपणे ग्रामसभेच्या मदतीने करेल . **८) लाभार्थी शेतकऱ्याची निवड करण्यासाठी पुढील बाबींचा विचार करावा .** १. आदिवासी शेतकरी लाभार्थी निवडताना त्या क्षेत्रातील वनहक्क कायद्यांतर्गत जमिनी प्राप्त झालेले लाभधारक तसेच कोलाम व पारधी शेतक-यांना प्राधान्य देण्यात यावे. २. लाभार्थी निवडताना Cluster approach ठेवण्यात यावा. ३. निवड केलेल्या शेतकऱ्यांना कमी खर्चाच्या सेद्रींय शेतीविषयक प्राथमिक माहिती व प्रशिक्षण अंमलबजावणी यंत्रणा देईल. ४. अंमलबजावणी यंत्रणेमार्फत योजनेच्या अनुषंगाने सहभागी शेतकऱ्यांच्या बाबत झालेला भौतिक तसेच आर्थिक बदलाचा अहवाल तयार करतील. ५. तयार केलेला अहवाल, यशोगाथा योजनेच्या अनुषंगाने निवडलेल्या गावात लोकांसमोर व शासनास सादर करतील. ९) संनियंत्रण व मुल्यमापनासाठी योजनेच्या एकुण खर्चाच्या २% निधी आयुक्त , आदिवासी विकास, नाशिक यांच्याकडे राखीव ठेवण्यात येईल.
९	**योजनेच्या अटी व शर्ती**	१) योजना विहीत वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेची असेल. २) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आऊटसोर्सिंग आवश्यक असल्यास त्याबाबतची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहिल, त्यासाठी स्वतंत्र निधी देण्यात येणार नाही. ३) प्रकल्पामध्ये होणाऱ्या बदलाची पूर्वकल्पना प्रकल्प अधिकारी व सनियंत्रण व मूल्यमापन समितीला देऊन समितीच्या मान्यतेनेच बदल करावा. ४) प्रकल्प राबवितांना आवश्यक असणारे प्रशिक्षण/कार्यशाळा व प्रात्यक्षिके संस्थेद्वारे देणे बंधनकारक असेल. ५) योजनेच्या प्रगतीबाबत माहिती वेळोवेळी प्रकल्प अधिकाऱ्यांना तसेच शासनास सादर करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील. ६) अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेला केलेल्या कामाचा पूर्तता अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल. ७) सदर योजनेची अंमलबजावणी करताना चलचित्र (video) व छायाचित्रे काढावीत व योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी व अंमल बजावणी यंत्रणा यांची राहील तसेच लाभार्थ्यांची यादी व Geo-tagged photographs व योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने योजनेच्या प्रगती बाबत माहिती वेळोवेळी CAS पोर्टल वर भरण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची असेल.

१०	सनियंत्रण व मूल्यमापन समिती	**योजनेचे संनियंत्रण व मुल्यमापना करीता प्रकल्प निहाय पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.** १.अपर आयुक्त, आदिवासी विकास अमरावती - **अध्यक्ष** २. जिल्हा कृषी अधिकारी,यवतमाळ -**सदस्य** ३ . दीनदयाल बहुउददेशीय प्रसारक मंडळ संस्था , प्रतिनिधी -**सदस्य** ४. प्रकल्प अधिकारी,ए.आ.वि.प्रकल्प पांढरकवडा -**सदस्य सचिव** ➢ योजनेच्या अंमल बजावणीच्या अनुषंगाने करण्यात येणारे कार्य व त्याची प्रगती या बाबत आहवाल शासनास तसेच आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना उपरोक्त समिती सादर करेल. ➢ योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून उपरोक्त समितीची बैठक दर २ महीन्यांनी आयोजित करावी व सदर बैठकीमध्ये योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात यावा तसेच योजना अंमलबजावणीमध्ये काही अडचणी असतील तर त्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.
११	योजनेच्या अंमलबजावणीचा कालावधी	शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून २ वर्षे
१२	निधी वितरणाची कार्य पद्धती	**सदर योजनेकरिता निधी वितरणाची कार्यपद्धती खालील प्रकारे निश्चित करण्यात येत आहे.** ➢ योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मंजूर झालेल्या रकमेच्या मर्यादेत खर्च करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची असेल. योजनेसाठी इतर कोणताही अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही याची दक्षता अंमलबजावणी यंत्रणेनी घ्यावी. तथापि, या प्रकल्पासाठी काही तातडीचा खर्च उद्भवल्यास प्रस्तावास मंजुरी दिलेल्या बाबींमधील खर्चामध्ये बदल करुन प्रस्तावाच्या मंजुर केलेल्या रकमेच्या मर्यादेत सदर खर्चास मंजुरी देण्याचे अधिकार नियंत्रक अधिकारी यांना राहिल. ➢ सदर योजनेचा निधी हा प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा यांच्या मार्फत अंमलबजावणी यंत्रणेला वर्ग करण्यात येईल ➢ शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा हे अंमलबजावणी यंत्रणेला कार्यारंभ आदेश देऊन प्रकल्पामध्ये प्रथम वर्षासाठी आवश्यक निधीच्या ५० टक्के रक्कम अदा करतील . ➢ सदर निधी प्राप्त होताच व कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणा प्रत्यक्षात कार्यास सुरुवात करेल .

		➢ प्रत्यक्ष कार्य सुरु होऊन ०६ महिने झाल्यानंतर व कामाच्या प्रगतीनुसार व मूल्यमापन व सनियंत्रण समितीच्या अहवालानुसार व समाधानकारक शिफारस केल्यानंतर प्रथम वर्षासाठी आवश्यक पुढील ५० टक्के निधी वर्ग करण्यात येईल. ➢ उपरोक्त प्रमाणे प्रक्रिया द्वितीय वर्षासाठी देखील राबवून ८० % निधी दोन टप्प्यात वर्ग केला जाईल. ➢ द्वितीय वर्षाचा उर्वरित २० टक्के निधी योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर व कार्य पूर्तता अहवाल सादर केल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणेस वितरीत करण्यात येईल. ➢ योजनेच्या अनुषंगाने आऊटसोर्सिंग करण्यात येणारे कर्मचारी यांचे मानधन देण्याची संपूर्ण जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील . ➢ योजनेच्या अनुषंगाने झालेल्या खर्चाचा अहवाल वेळोवेळी अपर आयुक्त,आदिवासी विकास,अमरावती तसेच सबंधित प्रकल्प अधिकारी यांना सादर करण्याची जबाबदारी अंमल बजावणी यंत्रणेची राहील.
१३	**योजनेची फलनिष्पती**	पीक उत्पादनात वाढ, नैसर्गिक संवर्धनाला पुरक व पोषक निविष्ठा निर्मिती,रसायन विरहीत शेती,आर्थिकदृष्ट्या परवडणारी छोट्या शेतकरी कुटुंबासाठी शेती मॉडेल,बहुविध पीक पद्धती आणि दुय्यम व्यवसाय,शेती कार्याचे गट निर्माण करून पीक उत्पादनात वाढ होईल.